**दिवाणी** किरकोळ अर्ज **क्र. १३/२०२६**
**रुक्मीणी वि. निरंक**
**नि.क्र. ८ खाली**

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा कागदपत्रांना निशाणी देण्याकरिता पुढील सरतपास अर्जदारतर्फे वकील श्री.चव्हाण यांच्या मार्फत शपथेवर सुरु –**

माझ्या शपथपत्रातील संपुर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. रावसाहेब चिंतामणी हे माझे वडील होते व राईबाई ही माझी आजी होती त्यांचा मृत्यु झालेला आहे. मी अर्जदार क्र. २ व ३ मुली आहोत व अर्जदार क्र. १ पत्नी आहे. आम्हाला भाऊ नाही. आमच्या शिवाय माझे वडील यांना कोणीही वारस नाही. आता मला निशाणी क्रमांक ४ च्या यादी खाली दाखल केलेले माझे वडील रावसाहेब यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखवले. अपलोड केलेले मृत्युप्रमाणपत्र आज आणले आहे ते मुळ प्रमाणे असल्यामुळे त्यास **निशाणी क्र.१०** देण्यात आले. आता मला सर्व अर्जदारांचे आधारकार्ड दाखवले. अपलोड केलेले आधारकार्ड हे आज सोबत आणलेल्या मुळ आधारकार्ड प्रमाणे असल्यामुळे त्यास **नि.क्र.११ ते १३** देण्यात आले. आता मला नि.क्र.९ च्या यादी खाली दि.०८/०१/२०२६ रोजी या प्रकरणाच्या नोटीसचे जाहिर प्रकटन झाल्याने वर्तमानत्र दाखवले. ते 'दैनिक लोकपत्र' या वृत्तपत्राचा अंक आहे. त्यास **निशाणी क्र.१४** देण्यात आले.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by GANESH VASANTAPPA GANDHE
Date: 2026.02.18 16:45:17 +0530

दि.१८/०२/२०२६

(जी.व्ही.गांधे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पैठण